निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २३४ वा.
मंगळवार :२८ ऑक्टोबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंडे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

# नवीन सागरी इतिहास घडवण्यासाठी भारत सज्ज - केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी/** मुंबई हे भारताच्या सागरी क्षेत्रातील महत्त्वाचे स्थान असून 'इंडिया मेरीटाईम वीक-२०२५'च्या निमित्ताने मुंबईमध्ये भारत नवीन सागरी इतिहास घडवण्यासाठी सज्ज असल्याचे प्रतिपादन केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांनी केले. तर मुंबई ही देशाच्या सागरी शक्तीचा केंद्रबिंदू असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. यावेळी नेस्को, गोरेगाव येथे आयोजित 'इंडिया मेरीटाईम वीक- २०२५' या आंतरराष्ट्रीय सागरी परिषदेचे उद्घाटन केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलनाने झाले. यावेळी केंद्रीय गृह मंत्री श्री. शाह यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

### 'इंडिया मेरीटाईम वीक - २०२५'चे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते उद्घाटन

उद्घाटन सोहळ्यास केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी व जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन शरण मांझी, केंद्रीय राज्यमंत्री शंतनु ठाकूर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, आणि केंद्रीय सचिव विजय कुमार, आदी मान्यवर उपस्थित होते.

'इंडिया मेरीटाईम वीक २०२५' च्या निमित्ताने आज जगभरातील सागरी तज्ज्ञ, उद्योगपती आणि प्रतिनिधी भारतात एकत्र आले असल्याचे सांगून, केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह म्हणाले की, 'गेटवे ऑफ इंडिया' आता 'गेटवे ऑफ द वर्ल्ड' बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. भारताचा ११ हजार किलोमीटरचा किनारा आता जागतिक विकास केंद्र होत आहे. सागरी क्षेत्र देशाच्या 'जीडीपी'त ६० टक्क्यांहून अधिक योगदान देते. पाच हजार वर्षांपूर्वीपासून भारत सागरी व्यापारात अग्रस्थानी होता.

आज इंडो-पॅसिफिक क्षेत्रात भारत पुन्हा आपली सागरी ताकद सिद्ध करत आहे. सागर, सागरमाला, गतिशक्ती आणि समुद्रयान यासारख्या प्रकल्पांमुळे सागरी पायाभूत सुविधांना नवे बळ मिळाले आहे. भारत जहाजबांधणीत जगात पाचव्या क्रमांकावर असून नवीन बंदरांचीही उभारणी वेगाने सुरू असल्याचे ते म्हणाले.

केंद्रीय मंत्री श्री. शाह म्हणाले की, देशातील ९० टक्के व्यापार सागरी मार्गाने होतो. २०४७ पर्यंत भारत जागतिक सागरी नेतृत्व प्राप्त करण्याचे ध्येय आहे.

वाढवण बंदर लवकरच जगातील टॉप १० बंदरांमध्ये गणले जाणार आहे. ग्रेट निकोबार व कोचिन बंदरात नव्या गुंतवणुकीची प्रक्रिया सुरू आहे. मच्छीमारांच्या सुरक्षेसाठीही सरकारने ठोस उपाययोजना केल्या आहेत. जागतिक गुंतवणूकदारांनी भारताच्या सागरी क्षेत्रात सहभागी होऊन आपल्या आणि भारताच्या समृद्धीचा मार्ग प्रशस्त करावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

**महाराष्ट्र देशाच्या सागरी शक्तीचा केंद्रबिंदू - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

भारत आणि महाराष्ट्राकडे विविध क्षेत्रात अमर्याद संधी आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारत नव्या 'मेरीटाईम पॉवर'च्या रूपात उभा राहत आहे. महाराष्ट्र देशाच्या सागरी शक्तीचा केंद्रबिंदू आहे असे सांगून या प्रवासात गुंतवणूकदारांनीही सहभागी व्हावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

सागरी ताकदीत महाराष्ट्राचे योगदान मोठे आहे. मुंबई पोर्ट आणि जेएनपीए देशाच्या कंटेनर वाहतुकीत मोठी भूमिका बजावत आहेत.

### गुंतवणुकीचे नवे क्षितिज

या परिषदेत १०० पेक्षा अधिक देशांतील साडेतीनशेहून अधिक तज्ज्ञ सहभागी झाले असून, सागरी क्षेत्रात १० लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक गुंतवणुकीचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. भारत आणि विविध देशांमधील परस्पर सहकार्य वाढवून जागतिक सागरी उद्योगांना नवे बळ देण्याचे काम या परिषदेच्या माध्यमातून होणार आहे.




यात मुंबईसह, महाराष्ट्रातील बंदरांची भूमिकाही सदैव महत्वाची राहिली आहे. यातूनच मुंबईला देशाच्या आर्थिक राजधानीचा दर्जा मिळाला असल्याचे मुख्यमंत्रीफडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वाढवण पोर्टचे बांधकाम सुरू झाले आहे. ते पूर्ण झाल्यावर हे बंदर जगातील महत्त्वाच्या आणि पहिल्या दहा बंदरापैकी एक असेल. वाढवणमुळे भविष्यात महाराष्ट्रासोबतच भारत मेरीटाईम शक्तीच्या रूपात उदयास येईल. जागतिक व्यापार आणि जागतिक पुरवठा साखळीमध्ये भारताचे स्थान अधोरेखित असेच राहील. या बंदराच्या उभारणीमुळे मेरीटाईम क्षेत्रात, त्याचबरोबर उद्योग, व्यवसाय या अनुषंगाने महाराष्ट्रामध्ये अनेक संधी निर्माण होतील.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, महाराष्ट्राने नुकतीच महाराष्ट्र शिप बिल्डिंग पॉलिसी २०२५ जाहीर केली आहे. या धोरणांतर्गत जहाजबांधणीसाठी एक मजबूत इकोसिस्टम आणि गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण निर्माण केले जात आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मेरीटाईम व्हिजनमध्ये आणि अमृतकाल मेरीटाईम व्हिजनमध्ये, वाढवण पोर्ट एक मैलाचा दगड ठरणार आहे. महाराष्ट्रामध्ये लॉजिस्टिक आणि ब्लॉकचेन या दोन क्षेत्रांमध्ये महाराष्ट्राची सामरिक शक्ती आणि मेरीटाईम ताकद कशा प्रकारे विस्तारित करू शकू, यावरही राज्य शासन कार्यरत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

**सागरी शांततेतून विकास - केंद्रीय बंदरे मंत्री सर्वानंद सोनोवाल**

केंद्रीय बंदरे मंत्री सर्वानंद सोनोवाल म्हणाले की, शांतताप्रिय देशांमध्ये गुंतवणूक वाढते. देशात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली स्थैर्य निर्माण झाले आहे, त्यामुळे देशात मोठ्या प्रमाणावर गुंतवणुकीचे वातावरण तयार झाले आहे. सागरीक्षेत्र विकसित भारत निर्मितीतील महत्त्वाचा घटक ठरत आहे.



## पावसाचा कहर मक्याच्या कणसांना फुटले कोंब तर कापसाच्या झाल्या वाती

**नेतेमंडळी निवडणुकीत व्यस्त शेतकरी मात्र त्रस्त बळीराजावर दुहेरी संकट उभे राहिले**

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड /प्रतिनिधी/** कन्नड तालुक्यात नाचनवेल, चिंचोली लिंबाजी, करंजखेड, पिशोर परिसरात निसर्गाचा कहर दिवाळी सणाच्या दिवसापासून रोज पडत असलेल्या पावसामुळे शेतकरी पूर्णपणे चितेत आहे. हातातोंडाशी आलेले प्रमुख पीक मक्का आणि कापूस अति पावसाने सडून त्यांना जागेवरच कोंब फुटले आहे लाखो रुपयाचे खत, बी-बियाणं, औषधी फवारणी, उसने पैसे, उधार, कर्ज काढून केलेली पेरणी आणि आता त्यात निसर्गाचा कहर शेतकऱ्यावर दुहेरी संकट उभे राहिले आहे. त्यात शासनाने घोषणा करूनही अद्यापही शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा झालेली नाही. शेतकऱ्यांची दिवाळी होऊन आठवडा होत आला आहे मात्र शेतकरी पैशाच्या मदतीच्या प्रतीक्षेत आहे मात्र नेतेमंडळी निवडणुकीत व्यस्त असल्याचे संतप्त प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी दिली आहे मात्र शेतकरी त्रस्त झाला आहे.सर्वत्र कंणसाना कोंब फुटले आहे तर कापसाच्या वाती झाल्या आहे त्यामुळे शेतकऱ्यावर आर्थिक संकट उभे राहिले आहे शासनाने तत्काळ मदत द्यावी अशी मागणी शेतकरी करीत आहे. शेतातील हे दृश्य आहे. ही परिस्थिती सर्वत्र झाली आहे.

छायाचित्र सुनिल निकम

## तिसऱ्या युथ आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला सुवर्णपदक



**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी/** बहरीनमधील मनामा येथे आशियाई युवा क्रीडा स्पर्धा २०२५ मध्ये भारताने कबड्डीमध्ये पूर्ण विजय मिळवत सुवर्ण पदक पटकावले. मुलींच्या संघात कांजूरमार्ग येथील खेळाडू कुमारी सेरेना सचिन म्हसकर हिने भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा मान मिळवला. या कामगिरीबद्दल क्रीडा मंत्री ड. माणिकराव कोकाटे यांनी सेरेनासह भारतीय कबड्डी संघाचे अभिनंदन केले आहे.

१९ ते २३ ऑक्टोबर २०२५ रोजी पार पडलेल्या तिसऱ्या युथ आशियाई क्रीडा स्पर्धेत मुंबई उपनगर जिल्ह्यातील कांजूरमार्ग येथील स्वराज्य स्पोर्ट्स क्लबची खेळाडू कुमारी सेरेना म्हसकर हिने भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा मान मिळवला. मुले आणि मुली या दोन्ही भारतीय संघाने या स्पर्धेत अत्यंत उल्लेखनीय कामगिरी करीत सुवर्णपदक पटकावून देशाचा मान उंचावला.

या उत्कृष्ट यशाबद्दल क्रीडा व युवक कल्याण मंत्री ड. माणिकराव कोकाटे यांनी कुमारी सेरेना म्हसकर हिचे तसेच प्रशिक्षक, पालक व स्वराज्य स्पोर्ट्स क्लबच्या व्यवस्थापनाचे विशेष अभिनंदन केले. त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटले की, महाराष्ट्रातील तरुण खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय पातळीवर केलेली कामगिरी ही राज्यातील क्रीडा क्षेत्रासाठी प्रेरणादायी आहे. शासनाकडून अशा प्रतिभावंत खेळाडूंना सर्वतोपरी सहकार्य केले जाईल.

सेरेनाच्या या यशामुळे मुंबई उपनगर जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असून क्रीडाक्षेत्रातील नवोदितांसाठी ती प्रेरणास्थान ठरली आहे.अंतिम फेरीत, दोन्ही भारतीय संघ इराणविरुद्ध आमनेसामने आले, परंतू सामने अगदी वेगळ्या शैलीत झाले. मुलांच्या संघाने कठीण संघर्षाचा सामना केला आणि शेवटी ३५-३२ अशा गुणांसह इराणवर विजय मिळवला. याउलट, मुलींच्या संघाने उत्कृष्ट प्रदर्शन करत इराणचा ७५-२१ असा जबरदस्त पराभव केला.

# 'विकसित भारत २०४७' ध्येयाच्या वाटचालीत प्रत्येक घटकाचे योगदान मोलाचे - राज्यपाल आचार्य देवव्रत

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी/** पायाभूत सुविधांसह अन्य विविध क्षेत्रातही देशाने अभूतपूर्व अशी झेप घेतली आहे. या सुविधांमुळे भारत आत्मनिर्भरतेकडे आणि समृद्धीकडे वाटचाल करत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश विकसित भारत- २०४७ या ध्येयाकडे वाटचाल करीत असून यामध्ये प्रत्येक घटकाचे योगदान मोलाचे असल्याचे प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले.




यशवंतराव चव्हाण सेंटर येथे भारत २४ या वृत्तवाहिनीने आयोजित केलेल्या विकसित भारत लीडरशिप समिट २०२५ चा शुभारंभ राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आला. यावेळी वृत्त वाहिनीचे डॉ. जगदीश चंद्र, मनोज जग्याशी, शशिकांत शर्मा यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.राज्यपाल आचार्य देवव्रत म्हणाले, भारताने गेल्या दहा वर्षात आर्थिकदृष्टीने ११ व्या स्थानावरून पाचव्या आणि आता चौथ्या क्रमांकाकडे झेप घेतली आहे. जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने भारत वेगाने वाटचाल करत आहे. तसेच गेल्या दशकात २५ कोटींपेक्षा अधिक लोकांना द्रारिद्र्य रेषेबाहेर आणण्याचे ऐतिहासिक कार्य शासनाने केले असल्याचेही ते म्हणाले.


'विकसित भारत २०४७' मध्ये केंद्र शासनामार्फत केले जात असलेले काम, देशाच्या प्रगतीच्या, जनतेच्या विकासाच्या तसेच नाविन्यपूर्ण उपक्रमांना भारत २४ वाहिन्यांच्या माध्यमातून सर्वदूर पोहचविण्याचे काम होत असल्याबद्दल राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी या वहिनीच्या कामाचे कौतुक केले.या समारंभात राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम केलेल्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

# घनसावंगी तालुक्यात आवकाळी पावसाने कापसाचे मोठे नुकसान शेतकरी हवालदिल

**आत्ताच एक्सप्रेस**

**घनसावंगी/ प्रतिनिधी/** घनसावंगी तालुक्यासह परिसरात रविवारी संध्याकाळच्या सुमारास अवेळी पावसाने हजेरी लावली. दिवसभर उन्हाळी वातावरण असताना अचानक दाट काळे ढग दाटले आणि काही क्षणातच धुवांधार पाऊस बरसला. या अवेळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

सध्या कापूस वेचणीच्या हंगामात असताना या पावसाने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला कापूस पूर्णपणे भिजवला. अनेक शेतकऱ्यांनी सकाळपासून वेचणी करून कापूस शेतातच ठेवला होता, परंतु अचानक आलेल्या पावसामुळे तो पूर्णपणे ओला झाला. भिजलेल्या कापसाच्या वाती तयार झाल्याने गुणवत्तेवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. काही शेतकऱ्यांना तर आज वेचलेला कापूस घरापर्यंतही घेऊन जाता आला नाही.



तालुक्यातील तिर्थपुरी बाणेगाव रामसगाव जोगलदेवी मांदाळा, म. चिंचोली, शिंदखेड, बोलेगाव, बोडखा बु. आदी भागांत पावसाची विशेष नोंद झाली आहे. आधीच अतिवृष्टी आणि अनिश्चित हवामानामुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना या पावसाने पुन्हा एकदा धक्का बसला आहे.

आधीच खरीप हंगामात पिकांचे नुकसान झाले, आता हाताशी आलेला कापूसही पावसाने भिजला. मेहनतीचे सगळे स्वप्न पाण्यात गेले, अशी व्यथा अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. ग्रामीण भागात पुन्हा एकदा हवामान अनिश्चित झाल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण आहे.

# जैन मंदिर यांच्या मालकीची मालमत्ता अनाधिकृत पणे विक्री केली ती खरेदीविक्रीचा व्यवहार रद्द करावे,फुलंब्री सकल जैन समाजाची मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री/प्रतिनिधी** /सकल दिगंबर जैन समाज फुलंब्री येथील सर्व समाज बांधव भगिनी यांच्या तर्फे काल दिनांक २७ ऑक्टोंबर २०२५ रोजी फुलंब्री च्या तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. सेठ हिराचंद नेमचंद स्मारक ट्रस्ट या सार्वजनिक ट्रस्टच्या विश्वस्त मंडळाने लबाडीपूर्वक धर्मदाय आयुक्त महाराष्ट्र शासन यांना खोटी व चुकीची माहिती सादर करत विश्वस्त संस्थेची पुणे येथील मोडेल कॉलनी परिसरातील तीन एकर जागा चुकीच्या व बेकायदेशीर पद्धतीने विक्री करून टाकली यामुळे देशातील समस्त जैन समाज अत्यंत आक्रमक आहे.

या जागेत शेठ हिराचंद नेमचंद दिगंबर जैन बोर्डिंग या नावाने जैन विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह सुविधा १९६० साला पासून सुरू करण्यात आली मात्र संस्थेची इमारत जीर्ण व मोडकळीस आल्याचे कारण विश्वस्त मंडळाने दर्शवीत राज्याचे धर्मदाय आयुक्त याच्याकडे संस्थेची संपूर्ण तीन एकर जागा विक्री करण्यासाठी दिनांक १३.२.२०२५ रोजी परवानगी मागितली सदर बाबत दिनाक ४.४.२०२५ रोजी मा. धर्मदाय आयुक्त मानी विश्वस्त मंडळाला जागा विक्री करण्यासाठी परवानगी दिली. त्यानुसार विश्वस्त मंडळांनी दिनाक १५.५.२०२५ रोजी गोखले बिल्डर या विकसकाला संस्थेची संपूर्ण तीन एकर जमीन ३११ कोटी रुपयांना विक्री करण्यासाठी करार केला. त्यानुसार विकसक है संस्थेला २३० कोटी रुपये देतील व उर्वरित ८१ कोटी रुपयांच्या बदल्यात विकसक है ट्रस्ट सस्थेला दहा गुठे क्षेत्र त्यावर साडेतीन गुंठे क्षेत्रात ४० हजार स्केअर फुट बांधकाम ९९९ वर्षाच्या भाडेकरारादवारे देतील.संस्थेच्या पटनेनुसार (ट्रस्ट डीड) विश्वस्त मंडळाला अशा पधतीने जागा विक्री करण्याचा कोणालाही अधिकार नाही. संस्थेच्या ट्रस्ट ही नुसार संस्था चालविताना जर काही आर्थिक अडचण आल्यास विश्वस्त मंडळाने समाजाकडे दान मागणी करावी तसेच रक्कम उभे करण्यासाठी पर्याय नमूद आहेत. असे असताना विश्वस्त मंडळानी या पर्यायांचा वापर न करता व्यक्तिगत फायदा मिळवण्यासाठी संस्थेची संपूर्ण जमीन विक्री करण्याचा पर्याय स्वीकारला. संस्थेच्या ताळेबंदमध्ये मागील दोन वर्षात मिळून १४ कोटी रुपये इतर कापण्यात वळवण्यात आले. संस्थेच्या इमारतीचे कुठले प्रकारे स्ट्रक्चरल ऑडिट न करता उत्कृष्ट स्थितीत असलेली इमारत चुकीच्या पद्धतीने मोडकळीस दाखविण्यात आली व बोगस आदेश प्राप्त केले, संस्थेच्या परिसरात १००८ श्री भगवान महावीर दिगंबर जैन मंदिर जे ६५ वर्षे जुने आहे त्याचे अस्तित्वच डावलण्यात आले. संस्थेचे विरुद्ध में मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल असताना तसेच त्याची सुनावणी बद्दल माहिती असताना जाणीवपूर्वक ८.१०.२०२५ रोजी विश्वस्तांनी गोखले बिल्डर्स याच्याबरोबर खरेदीखत उरकून घेतले व त्याच दिवशी बुलडाणा अर्बन बैंक व विरेश्वर पतसंस्था यांच्याकडून विकासकणे ७० कोटी रुपये कर्ज उचलून संपूर्ण मिळकत ही गाहाण ठेवली हे करत असताना मंदिर देखील गाहाण टाकण्यात आले आहे.

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस
संपादकीय
मंगळवार २८ ऑक्टोबर २०२५


# एकमेकांचे भ्रष्टाचार लपवणे हा महायुतीधर्म आहे का?

जैन बोर्डिंग वस्तीगृहाच्या जागेवरून युतीतील शिंदे गटाचे धंगेकर यांच्या विरोधात काल भाजपचे धीरज घाटे, गणेश बिडकर यांनी पत्रकार परिषद घेऊन महायुतीचा धर्म म्हणून भाजप आरोप करीत नव्हती परंतु आता त्यांची पण उणीधदुणी काढली जातील असा इशारा दिला आहे. त्याच वेळेस धंगेकर हे अनेक बेकायदा कामे करीत असल्याचा आरोप बिडकर यांनी केला आहे.

भाजप ही वॉशिंग मशीन असून भ्रष्टाचारी नेत्यांना पक्षात घेऊन पवित्र केले जाते असे दिसून आलेले आहे तर अनेकदा यांच्या नेत्याकडून तुमची सीडी आमच्याकडे आहे अशा पद्धतीच्या धमक्या दिल्या जातात. आता एकमेकांचे भ्रष्टाचार लपवणे हा युतीचा धर्म झाला आहे का?


जैन हॉस्टेल प्रकरणांमध्ये इतके दिवस भाजप का गप्प होती. आता परिस्थिती हाताबाहेर जाते आहे असे दिसून आल्यावर आणि या विक्री करारात अनेक चुकीच्या गोष्टी केल्या दिल्या असल्याचे समोर आल्यावर, त्यातून विक्री करार रद्द होण्याची खात्री झाल्यावरच आता ' माझा या व्यवहाराशी काही संबंध नाही' अशी स्वतःलाच क्लीन चिट देणारे मुरलीधर मोहोळ 'मी एक तारखेपूर्वी तोडगा काढून देतो ' असे आश्वासन देत आहेत. हा तद्दन ढोंगीपणा असून करार करण्यात त्यांचाच हात असल्याने रद्द करणे त्यांनाच सहज शक्य आहे. आता धर्मादाय आयुक्तांना वस्तुस्थिती दर्शक अहवाल सादर होणार असून त्यामुळे हा बेकायदेशीर जैन बोर्डिंग विक्री करार रद्द होईल अशी आम आदमी पार्टी ला आशा आहे.

याच पद्धतीने अनेक धर्मादाय संस्थांच्या जमिनीवर कब्जा मिळवल्याची अनेक उदाहरणे महाराष्ट्रात आहेत. राजकीय आशीर्वादाच्या सहाय्याने बिल्डर लॉबी हे घोटाळे करते. त्या भ्रष्टाचाराला मुळातूनच रोखण्यासाठी धर्मादाय कायद्यांची कडक अंमलबजावणी गरजेचे आहे.

# धनाजी जोशी यांचा शिवसेना (शिंदे गटात) प्रवेश भावी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार जयश्री ताई बाळु काब्दे यांच्या हस्ते प्रवेश

**आत्ताच एक्सप्रेस**

**देगलूर/ प्रतिनिधी/** शिवसेना शिंदे गटाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे बिगुल वाजले असता देगलुरात शिवसेना शिंदे गटाकडून कंबर कसली जात असुन शिवसेनेचे वरीष्ठ नेत्यांनी स्वबळाचा नारा देऊन कार्यकर्त्यांना कामाला लागण्याचे आदेश दिल्याने वरिष्ठांनाचे आदेशाचे पालन करण पक्षांचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब आमदार हेमंत पाटील, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार बोंढारकर ,बालाजी पाटील खतगावकर , उपनेते आनंदराव पाटील, जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, यांच्या आदेशानुसार आज देगलुरात सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असलेले धनाजी जोशी यांचा भावी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार जयश्रीताई बाळु काब्दे यांच्या हस्ते भगवी दस्ती घालून प्रवेश करण्यात आला व तसेच प्रभाग क्रमांक ९ मधील तुळजाभवानी मंदिर,साळवण हनुमान मंदिर,दत्त मंदिर,महादेव मंदिर, विरभद्र शिव मंदिर साठे नगर,आदी भागात जाऊन नारळ फोडुन आशिर्वाद घेऊन शुभकार्यासाठी सुरुवात करण्यात आली यावेळी उपस्थित भावी जयश्रीताई बाळु काब्दे, बाळु काब्दे, शिवसेना तालुकाप्रमुख गंगाधर तमलुरकर,शिवसेना शहर प्रमुख व्यंकट पुरमवार, महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख सविता ताई चप्पलवार, अशोक पांडलवार,मिलिंद सोनकांबळे कावळगावकर,किरण काब्दे ,नागेश आंगडे कावळगावकर,श्याम मारोती मंडपवार,ओमकार पाटील, यांच्या समवेत प्रभागातील प्रमुख लोक उपस्थित होते.मागील दोन ते तीन दशकांपासून नगरसेवक रुपाने जनतेच्या सेवेमध्ये मी व माझा परिवार सदैव तत्पर आहे. जेव्हा ह्या वेळेसच्या मतदानामध्ये नगराध्यक्ष पदासाठी महिलेला आरक्षण आहे हे कळले तेव्हा माझ्या पत्नीने माझ्याजवळ नगराध्यक्ष रुपाने देगलूर ला सेवा द्यावी ही इच्छा व्यक्त केली. आजवरच्या सेवेच्या कार्यामध्ये माझ्या पत्नीने अखंड मला साथ दिली आणि आज वेळ आली आहे की तिला मला साथ देण्याची. आणि मी ती नक्की देणारच.



> शिंदे गटाकडून बरेच उमेदवार नगराध्यक्ष पदासाठी इच्छुक आहेत पण आमचे मागील दोन ते तीन दशकाची सेवा पाहून पक्षश्रेष्ठींनी आम्हाला आत्मविश्वासाने तिकीट मिळेल असा शब्द दिला आहे.
>
> **-बाळु काब्दे**
> **(भावी नगराध्यक्ष जयश्रीताई बाळु काब्दे यांचे पती )**

# विज्ञानरत्न डॉ जयंत नारळीकर

जगप्रसिद्ध खगोल - भौतिक शास्त्रज्ञ आणि विज्ञानकथा लेखक, पद्मविभूषण स्वर्गीय डॉ जयंत नारळीकर यांना यंदाचा मरणोत्तर विज्ञानरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. विज्ञानरत्न हा वैज्ञानिक क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार समजला जातो. डॉ जयंत नारळीकर यांना मरणोत्तर का होईना हा पुरस्कार मिळाल्याने खगोलप्रेमींना कमालीचा आनंद झाला आहे कारण या पुरस्कारावर त्यांचा हक्कच होता. डॉ जयंत नारळीकर यांना हा पुरस्कार त्यांच्या हयातीतच मिळाला असता तर आणखी आनंद झाला असता पण असो देर आये दुरुस्त आये असे म्हणत या पुरस्काराचे स्वागत करायला हवे. डॉ जयंत नारळीकर यांचे याच वर्षी २० मे रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले होते त्यांच्या निधनाने बहुविध प्रतिभेचे धनी असलेले व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. डॉ जयंत नारळीकर यांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील रँग्लर विष्णू वासुदेव नारळीकर हे प्रसिद्ध गणीततज्ञ होते. ते वाराणसी येथील बनारस विश्व विद्यापीठाच्या गणित विभागाचे प्रमुख होते तर आई सुमती या संस्कृत विदुषी होत्या. वाराणसी येथे शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या नारळीकर यांनी १९५७ साली विज्ञानाची पदवी प्राप्त केली. (बीएस्सी ) त्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी ब्रिटनमधील केम्ब्रिज येथे गेले. तिथे त्यांनी बीए,एमए आणि पीएचडी या पदव्या मिळवल्या. शिवाय रँग्लर आणि खगोल शास्त्राचे टायसन मेडल आणि इतर अनेक बक्षिसे मिळवली. त्यांचे पिएचडीचे गाईड डॉ फ्रेड हॉईल यांच्या साथीने त्यांनी स्थिर स्थिती सिद्धांतावर संशोधन केले व जगप्रसिद्ध बिग बँग सिद्धांताला आव्हान देणारा नवा सिद्धांत तयार केला. १९६६ साली नारळीकर यांचा विवाह मंगला राजवाडे ( गणितज्ञ ) ह्यांच्याशी झाला. त्यांना तीन मुली आहेत गीता, गिरिजा लीलावती. १९७२ साली ते मुंबईत परतले. तिथे त्यांनी टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या खगोलशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारली. १९८८ साली त्यांची पुणे येथील आयुका संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली. डॉ जयंत नारळीकर यांनी पाच दशकांहून अधिक काळ खगोल आणि भौतिक शास्त्रात संशोधन केले. त्याच बरोबर सतत पुस्तके लिहिण्याचा कार्यक्रमही चालू ठेवला. डॉ जयंत नारळीकर हे रुढार्थाने साहित्यिक नसले तरी त्यांनी केलेले लेखन हे दर्जेदार साहित्यिकापेक्षा कमी दर्जाचे नाही. विज्ञानकथेसारखा वेगळा प्रवाह मराठी साहित्यात रुजविण्याचे मोठे काम त्यांनी केले. विज्ञानासारखा रुक्ष आणि अवघड विषय ललित साहित्याच्या अंगाने मांडून त्याला सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहचवण्याचे अवघड व महत्वाचे कार्य त्यांनी केले. त्यांनी केलेले विज्ञानविषयक लेखन व सुरस विज्ञान कथा यामुळे विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागली. खगोल शास्त्रात सातत्याने संशोधन करत असताना डॉ जयंत नारळीकरांनी लेखनही चालू ठेवले. त्यांनी अनेक विज्ञानकथा लिहिल्या. त्यांची यक्षाची देणगी, अंतराळवीर, भस्मासुर, टाइम मशीनची किमया, प्रेषित, अभयारण्य, याला जीवन ऐसे नाव, वामन परत आला, गणितातील गमतीजमती, नभात हसरे तारे, नव्या सहस्त्रकाचे नवे विज्ञान, विज्ञान आणि वैज्ञानिक, विज्ञानगंगेचे अवखळ वळणे, विज्ञानाची गरुडझेप, विज्ञानाचे रयचिते ही पुस्तके गाजली. त्यांनी लिहिलेले आकाशाशी जडले नाते व अंतराळ आणि विज्ञान ही पुस्तके प्रचंड गाजले. ही पुस्तके म्हणजे त्यांच्या दर्जेदार साहित्याचे उत्तम उदाहरण आहेत. तीन नगरातील माझे विश्व हे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिध्द आहे. यक्षाची देणगी या त्यांच्या पहिल्याच पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला होता. सामान्य माणसाला खगोल शास्त्र समजवण्यासाठी त्यांनी अनेक वर्ष प्रयत्न केले. आपल्या लेखनातून त्यांनी अंधश्रद्धा दूर करण्याचाही प्रयत्न केला. बहुविध प्रतिभेचे धनी असलेले डॉ जयंत नारळीकर यांच्यासारख्या व्रतस्थ व्यक्तीमत्वास ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले हा त्यांच्या बहुविध प्रतिभेचा गौरव होता. डॉ जयंत नारळीकर यांच्यासारखे जेष्ठ विज्ञानविषयक लेखक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बनल्यामुळे विज्ञान साहित्याला अधिकाधिक प्रतिष्ठा लाभली तसेच विज्ञानाचा प्रसार होण्यास व तरुण पिढीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यास त्यांच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा खूप उपयोग झाला.

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

## गझल

आनंदकंद
गागालगा लगागा गागालगा लगागा

कित्येक रात्र भोगा, भेटावयास आई
त्या भावनेस भेगा, भेटावयास आई

हा जन्म परत घेण्या, घाई मलाच झाली
मोठेपणात त्रागा, भेटावयास आई

आस्थेस अर्थ नाही, ते स्वप्न थंड झाले
दररोज स्वर्गरांगा, भेटावयास आई

माझ्या छळास आता, आरंभ काल झाला
न्यायास काळ भुंगा, भेटावयास आई

चक्षूस वाट आहे, भेटेल ती कधीही

मिथ्येस आज जागा, भेटावयास आई
नेत्रात आस वाहे, आई मला मिळावी
स्वप्नास आज त्यागा, भेटावयास आई

त्याची उनाड खेळी, पृथ्वीवरी फिरणे
श्रुद्धेस मरण मागा, भेटावयास आई

**-अंकुश शिंगाडे नागपूर**

# 'पीएम जनमन' योजनेतील कामगिरीसाठी विद्युत मंत्रालयाकडून महावितरणचे कौतुक

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी/** केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान म्हणजेच पीएम जनमन योजनेमध्ये महावितरणने केलेल्या कामगिरीचे व १३१ टक्के उद्दिष्टपूर्तीचे केंद्रीय विदयुत मंत्रालयाने कौतुक केले आहे. याबाबत केंद्रीय ऊर्जा सचिव पंकज अग्रवाल यांनी राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांना पाठवलेल्या पत्रामध्ये महावितरणच्या कामगिरीचा गौरव केला आहे.

देशातील दुर्गम भागात निवासी व सर्वार्थाने दुर्बळ आदिवासी गट (झतढश्री) यांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीत सुधारणा करण्यासाठी केंद्र शासनाने पीएम जनमन योजना सुरू केली आहे. दुर्गम भागातील अतिमागास जनजाती समूहांना सुरक्षित घरे, पिण्याचे पाणी, स्वच्छता, शिक्षण, आरोग्य, उपजीविकेच्या संधी आणि वीज यासारख्या मूलभूत सुविधा व सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात या योजनेअंतर्गत राज्यातील १६ जिल्ह्यांतील ११३७ गावांमध्ये लाभार्थ्यांना नवीन वीजजोडण्या व त्यासाठी विद्युतीकरणाची कामे महावितरणकडून वेगाने सुरू करण्यात आली. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनीही या कामांचा वेळोवेळी आढावा घेतला. त्याची फलनिष्पत्ती म्हणजे योजनेमध्ये १३१ टक्के उद्दिष्टपूर्ती झाली आहे.

महाराष्ट्रासाठी ८ हजार ५५६ लाभार्थ्यांना वीजजोडणी देण्याचे उद्दिष्ट होते. प्रत्यक्षात तब्बल ११ हजार २३५ घरांमध्ये नवीन वीजजोडणी कार्यान्वित करण्यात आली आहे.

नवी दिल्ली येथे आदि कर्मयोगी अभियान २०२५ची राष्ट्रीय परिषद नुकतीच झाली. पीएम जनमन योजनेमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल राष्ट्रपतींच्या हस्ते केंद्रीय विद्युत मंत्रालयाचा या परिषदेत गौरव करण्यात आला. या गौरवासाठी महाराष्ट्राचा ऊर्जा विभाग व महावितरणचे देखील मोठे योगदान आहे.

ासी आदिवासी गटांच्या घरांचे विद्युतीकरण करण्यासाठी महाराष्ट्राने केलेल्या कामगिरीचे कौतुक आहे. आदिवासी कल्याण, सक्षमीकरण व सर्वसमावेशक विकासात महाराष्ट्राच्या ऊर्जा विभागाचे व महावितरणचे योगदान महत्त्वाचे आहे, असे केंद्रीय ऊर्जा सचिव पंकज अग्रवाल यांनी पत्रामध्ये नमूद केले आहे.

# नायगाव ते शेळगाव छत्री रस्ता खड्डेमय - हजारो विद्यार्थ्यांचे जीव धोक्यात

**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड/ प्रतिनिधी/** नायगाव ते शेळगाव छत्री हा मुख्य मार्ग सध्याखड्डेमय झाल्यामुळे नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व नोकरदार वर्ग प्रचंड त्रस्त झाला आहे. दररोज हजारो विद्यार्थी या मार्गाने शाळा आणि महाविद्यालयात जातात. रस्त्याची अत्यंत वाईट अवस्था झाल्यामुळे अपघातांची शक्यता वाढली असून जनजीवन धोक्यात आले आहे.स्थानिक



नागरिकांनी सांगितले की, गेल्या अनेक महिन्यांपासून रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय आहे. प्रशासन व लोकप्रतिनिधी यांचे लक्ष वेधूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे आता जनतेचा संयम संपत चालला आहे.शेळगाव छत्री येथील नागरिक अविनाश विठ्ठलराव अनेराये यांनी मुख्यमंत्री व सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना ई-मेलद्वारेअर्ज पाठवून रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. त्यांनी अर्जात नमूद केले आहे की, जर रस्त्याचे काम लवकर हाती घेण्यात आले नाही तर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत नागरिक मतदानावर बहिष्कार टाकतील.या विषयावर सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने लक्ष घालून आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

# कल्पनाशक्ती, तंत्रज्ञान आणि समाजाचा बदलता चेहरा

२८ ऑक्टोबर हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे मूळ १८९२ सालच्या फ्रान्समध्ये दडलेले आहे, जेव्हा एमिल रेनॉ यांनी पॅरिसमधील 'म्युझियम ग्रेव्हिन' येथे "Pantomimes Lumineuses' हा जगातील पहिला ॲनिमेटेड फिल्म शो सादर केला. त्या घटनेने मानवाच्या कल्पनाशक्तीला आणि दृश्य तंत्रज्ञानाला एक नवीन दिशा दिली. त्या स्मरणार्थ युनेस्कोच्या आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन संघटनेने २८ ऑक्टोबर हा दिवस ॲनिमेशनचा जागतिक उत्सव म्हणून मान्यता दिली. आज हा दिवस केवळ कलाविष्काराचा सन्मान नाही, तर मानवी सर्जनशीलता, सामाजिक परिवर्तन, आणि सांस्कृतिक संवादाचे प्रतीक बनला आहे.

ॲनिमेशन म्हणजे केवळ बालकांचे मनोरंजन नव्हे; ते एक सांस्कृतिक, शैक्षणिक आणि समाजशास्त्रीय माध्यम आहे. चलतचित्रांच्या माध्यमातून कल्पनांना जीवन देणारे हे कला-साहित्य मानवी मनोविज्ञान, सामाजिक मूल्ये आणि सांस्कृतिक अभिव्यक्ती यांचे एकत्रित रूप आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता, ॲनिमेशन हे केवळ दृश्य कलारूप नसून, समाजातील विचारप्रवाह, सत्तासंबंध, लिंगभेद, वर्गभेद आणि सांस्कृतिक ओळख यांचे प्रतिबिंब आहे.

ॲनिमेशनचा इतिहास हा मानवाच्या कल्पनाशक्तीच्या प्रगतीचा इतिहास आहे. गुहेतील चित्रांपासून ते डिजिटल ३ऊ आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित दृश्यांपर्यंतची ही उत्क्रांती म्हणजे सर्जनशीलतेचा प्रवास आहे. समाजशास्त्रज्ञ मॉरिस हाल्बवाच्स यांनी मांडलेल्या 'सामूहिक स्मृती' (Collective Memory) या संकल्पनेनुसार, प्रत्येक समाज आपल्या इतिहास आणि संस्कृतीचे संरक्षण आठवणींमधून करतो. ॲनिमेशन ही त्या स्मृती जिवंत ठेवण्याची आधुनिक पद्धत आहे. पौराणिक कथा, लोककथा, ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वे आणि सामाजिक विचार हे सर्व आज ॲनिमेशनच्या माध्यमातून नव्या पिढीकडे पोहोचत आहेत. भारतातील ॲनिमेशनचा प्रवास स्वतंत्र आणि बहुआयामी आहे. १९५६ साली माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या फिल्म विभागाने 'ढहश इरपूरप ऊशशी' हा पहिला भारतीय ॲनिमेशन चित्रपट प्रदर्शित केला. त्यानंतर राम मोहन, भिमसेन, जी.के. गोखले, कैलाश रेखी यांनी भारतीय ॲनिमेशनला जागतिक ओळख दिली. 'रामायण', 'हनुमान', 'पंचतंत्र कथा', 'छोटा भीम', 'मोटू पतलू', 'शक्तिमान', 'आर्यन' यांसारख्या ॲनिमेशन मालिका भारतीय संस्कृती, नैतिकता आणि सामाजिक विचारांना दृश्यरूप देतात. या कलाकृतींनी ग्रामीण आणि नागरी समाजातील मुलांपर्यंत सांस्कृतिक वारसा पोहोचवण्याचे कार्य केले आहे.

समाजशास्त्रीयदृष्ट्या ॲनिमेशन ही सामाजिकरणाची प्रक्रिया घडविणारे माध्यम आहे. एमिल दुर्खीम यांच्या मते, समाजातील प्रत्येक संस्था सामाजिक ऐक्य वाढवते. ॲनिमेशनमधून मुलां मध्ये नैतिक मूल्ये, सहानुभूती, प्रामाणिकपणा, सहकार्य आणि पर्यावरणाबद्दलची जाणीव विकसित होते. उदा. 'पंचतंत्र कथा' अथवा 'जातक कथा' यांवर आधारित ॲनिमेशनमधून जीवनमूल्ये अत्यंत सोप्या व रंजक पद्धतीने सांगितली जातात. ॲनिमेशनमधील दृश्य आणि भावनिक सादरीकरणामुळे बालकांच्या मनावर त्या मूल्यांचा दीर्घकालीन प्रभाव पडतो. परंतु ॲनिमेशन केवळ मूल्यसंस्कारच रुजवत नाही; ते समाजातील असमानता, सत्तासंबंध आणि विचारसरणी देखील प्रतिबिंबित करते. अनेक लोकप्रिय ॲनिमेशन चित्रपटांमध्ये पाश्चात्त्य विचारसरणी, पुरुषप्रधानता आणि उपभोगतावादी जीवनशैलीचे दर्शन घडते. पियरे बोर्द्यू यांच्या 'सांस्कृतिक भांडवल' या संकल्पनेनुसार, समाजातील कलामाध्यमे ही सत्ता आणि वर्गसंघर्षाशी निगडित असतात. ॲनिमेशनही त्याला अपवाद नाही. डिस्ने, पिक्सार, ड्रीमवर्क्स यांसारख्या कंपन्यांनी जगभरात सांस्कृतिक कल्पना पसरवल्या पण त्या प्रामुख्याने पाश्चात्त्य मूल्यांवर आधारित आहेत. परिणामी, स्थानिक संस्कृती आणि परंपरा हळूहळू बाजूला पडतात.

तथापि, भारतीय ॲनिमेशनने या प्रवाहाला वेगळी दिशा दिली आहे.

भारतीय निर्मात्यांनी लोककथांवर, आणि भारतीय नैतिक तत्त्वांवर आधारित कथा मांडल्या. 'छोटा भीम' सारख्या कथांमध्ये भारतीय सामाजिक मूल्ये, कुटुंबव्यवस्था आणि नैतिकतेचे दर्शन घडते. अशा प्रकारे ॲनिमेशन समाजातील संस्कृतीचा प्रसार आणि सांस्कृतिक ओळख जपण्याचे कार्य करते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, ॲनिमेशन हे एक सांस्कृतिक संवादाचे साधन आहे. समाजातील वेगवेगळ्या गटांना एकत्र आणणारे, त्यांच्या कथा आणि भावना मांडणारे हे माध्यम विविधता टिकवून ठेवते. उदा. आदिवासी जीवन, पर्यावरणीय प्रश्न, महिला सक्षमीकरण, आणि सामाजिक न्याय या विषयांवरील ॲनिमेशन चित्रपटांद्वारे सामाजिक जाणीवा अधिक प्रभावीपणे पोहोचतात.

ॲडोर्नो आणि हॉर्कहायमर यांनी "Culture Industry' ही संकल्पना मांडताना दाखवले की, आधुनिक माध्यमे उपभोगवादी संस्कृती वाढवतात. ॲनिमेशन उद्योग याच प्रवृत्तीचे आधुनिक रूप आहे. लोकप्रिय पात्रांवर आधारित खेळणी, कपडे, खाद्यपदार्थ, आणि मोबाइल गेम्स यांच्या विक्रीमुळे ॲनिमेशन हे भांडवलशाही संस्कृतीचे प्रमुख साधन बनले आहे. या प्रक्रियेत बालकांचे मन उपभोगाच्या संस्कृतीकडे आकर्षित होते. परंतु त्याचबरोबर शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक संदेशांसाठी ॲनिमेशनचा उपयोग केल्यास ते परिवर्तनाचे सामर्थ्यवान माध्यम ठरते. सध्या शैक्षणिक ॲनिमेशन ही संकल्पना अत्यंत लोकप्रिय झाली आहे. 'एडूटेनमेंट' (Education + Entertainment) या पद्धतीद्वारे विज्ञान, इतिहास, गणित आणि सामाजिक शास्त्रे यांची समज विद्यार्थ्यांना सोप्या, दृश्यप्रधान आणि रंजक स्वरूपात करून देण्यात येते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हे विशेषतः उपयुक्त ठरते. समाजातील ज्ञानाचे लोकशाहीकरण घडविण्याचे कार्य ॲनिमेशन प्रभावीपणे करत आहे. डिजिटल युगात ॲनिमेशनचे रूप अत्यंत व्यापक झाले आहे. 3D, आणि AI यांसारख्या तंत्रज्ञानामुळे ॲनिमेशन आता कल्पनेच्या मर्यादा ओलांडून वास्तवाशी मिसळत आहे. सारख्या प्लॅटफॉर्म्सनी या कलारूपाला जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून दिली आहे. भारतीय निर्माते जागतिक दर्जाचे ॲनिमेशन तयार करत आहेत आणि "Make in India' अंतर्गत ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग आणि कॉमिक्स क्षेत्रात मोठ्या रोजगारनिर्मितीच्या संधी निर्माण होत आहेत. National Skill Development Corporation च्या अहवालानुसार, २०३० पर्यंत या क्षेत्रात सुमारे २० लाख नोकऱ्या निर्माण होऊ शकतात.

तथापि, ॲनिमेशनचा समाजावर होणारा परिणाम सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही बाजूंनी पाहिला पाहिजे. हिंसा, लिंगभेद, अति-उपभोग आणि अवास्तव कल्पना दाखवणाऱ्या ॲनिमेशनमुळे बालकांच्या मनावर नकारात्मक परिणाम होऊ शकतात. त्यामुळे माध्यम साक्षरता (Media Literacy) वाढवणे अत्यंत आवश्यक आहे, ज्यायोगे प्रेक्षक ॲनिमेशनमधील संदेशांची चिकित्सक दृष्टीने व्याख्या करू शकतील. समाजशास्त्राच्या परिप्रेक्ष्यात ॲनिमेशन हे 'आरसा' आहे, जो समाजातील वास्तव दाखवतो, आणि कधी कधी ते वास्तव बदलण्याची प्रेरणाही देतो. सामाजिक असमानता, लिंगभेद, पर्यावरणीय संकट, युद्ध, शांती, आणि मानवतेचे प्रश्न हे सर्व ॲनिमेशनच्या माध्यमातून संवेदनशील आणि प्रभावीपणे मांडता येतात. त्यामुळे ॲनिमेशन ही केवळ कलात्मक अभिव्यक्ती नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाची शक्ती आहे.

२८ ऑक्टोबरचा 'आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन दिन' आपल्याला आठवण करून देतो की मानवी कल्पनाशक्ती अमर्याद आहे. ती समाजातील बंधने मोडून नवीन विचार, नवीन संस्कृती आणि नवीन दृष्टिकोन निर्माण करू शकते. ॲनिमेशन ही केवळ कला नाही, ती कल्पनाशक्तीच्या समाजशास्त्राचे दृश्य रूप आहे, जिथे तंत्रज्ञान आणि मानवी भावना एकत्र येतात, आणि जिथे प्रत्येक रंग, प्रत्येक चळवळ, प्रत्येक पात्र समाजाच्या आरशात नवीन प्रतिबिंब निर्माण करते. आजच्या डिजिटल जगात, जिथे माहिती आणि प्रतिमा सर्वत्र उपलब्ध आहेत, तिथे ॲनिमेशन समाजाला विचार करण्यास, संवेदनशील होण्यास आणि बदल घडविण्यास प्रवृत्त करते. म्हणूनच ॲनिमेशनकडे केवळ मनोरंजन म्हणून न पाहता, ते मानवी कल्पनाशक्तीचे सामाजिक माध्यम म्हणून ओळखले पाहिजे. हाच या दिवसाचा खरा संदेश की ॲनिमेशन म्हणजे मानवी विचारांचा, संस्कृतीचा आणि समाजाचा अखंड प्रवास आहे.

**-डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**

# संक्षिप्त

## २२ वर्षानंतर जमला मित्राचां गोतावळा जि.प.शाळेच्या विद्यार्थ्यांचे स्नेहमिलन उत्साहात



**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव /प्रतिनिधी** / जिल्हा परिषद प्रशाला सोयगांव येथील २००३ च्या बँचचे विद्यार्थी आणि शिक्षकांचा स्मेहमिलनाचा सोहळा अगस्ती महाराज संस्था येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्यात शालेय जीवनातील जून्या आठवणीनां उजाळा मिळाला. सरस्वती पुजनाने कार्यक्रमाला सुरूवात झाली. शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सर्व गुरूजनाचां सन्मान करण्यात आला. प्रत्येक विद्यार्थ्याने स्वत:च्या परिचयासह मनोगत व्यक्त केले. त्यानंतर उपस्थित शिक्षकांनी विद्यार्थ्यानां मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांशी संवाद साधतानां शिक्षकाचां कंठ दाटून आला तसेच विद्यार्थ्यांच्या प्रगतीबद्दल शिक्षकांनी समाधान व्यक्त केले. आम्ही शिकवलेले धडे आयुष्यात फळाला आले हेच आमचे समाधान आणि कमाई आहे, अशी भावना शिक्षकांनी व्यक्त केली. कार्यक्रमात प्रमुख पाहूणे म्हणून माजी मुख्याध्यापक लक्ष्मणराव रोकडे, के.के. फुसे, जी.व्ही. जगताप, आर.एल. फुसे, जे.व्ही. जगताप, चौधरी मँडम यांची उपस्थिती लाभली. हास्य विनोद, गाणी, गप्पा, फोटोसेशन आणि भोजनामुळे वातावरण आनंदी झाले.

## जरंडी ग्रामपंचायतीची बांबूची शेती,लोकसहभागातून उपक्रम




**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव / विजय पगारे** /गावाच्या विकासा सोबतच शेतीशी नाळ जोडून जरंडी ग्रामपंचायतीने बटाई ने शेती करून दोन एकर क्षेत्रात बांबूच्या रोपांची लागवड केली शेतीच्या सोबत स्मशानभूमीत व हुतात्मा राजहंस स्मारकात ही दोन हजार पाचशे बांबूच्या रोपांची शनिवारी लागवड केली दरम्यान ग्रामपंचायतिचा बांबू शेतातून येणाऱ्या उत्पन्नातून गावाचा चेहरा मोहरा बदलविण्याचा संकल्प ग्रामपंचायतीने केला आहे सरपंच स्वातीताई पाटील,उपसरपंच संजय पाटील,ग्रामपंचायत अधिकारी सुनील मंगरुळे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविला आहे लोकसहभागातून ग्रामपंचायतने बांबुची शेती हा राज्यातील पहिला एकमेव प्रकल्प ठरला आहे दरम्यान बटाईने ग्रामपंचायत ने यापूर्वीही आंब्याची व शेवग्याची शेती केली आहे यातून मिळालेल्या उत्पन्नातून गावाचा विकास साधण्याची किमया जरंडी ग्रामपंचायतीने साधली आहे...

**लोकसहभागातूनच मशागत**

दरम्यान ग्रामपंचायतने कसलेल्या बांबूच्या शेतीची मशागत लोकसहभागातून करण्यात येणार आहे असे ग्रामपंचायत अधिकारी सुनील मंगरुळे यांनी सांगितले आहे दररोज एक जण शेती वर मशागत व देखभाल करण्यासाठी जाणार आहे ग्रामपंचायत कर्मचारी या बांबूच्या शेतीवर लक्ष केंद्रित करतील असे सरपंच स्वाती ताई पाटील यांनी सांगितले.

## गोळीबार सराव; पडेगाव भागात सतर्कता बाळगण्याचे आवाहन




**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** ग्रामिण पोलीस अधिकारी, अंमलदार यांचा वार्षिक गोळीबार सराव दि.२७ ऑक्टोंबर ते ७ नोव्हेंबर या कालावधीत पडेग्व येथील फायरबट येथे होणार आहे. याकालावधीत फायरींग बट हद्दीतील नागरिकांनी सतर्क रहावे,असे आवाहन पोलीस मुख्यालयाच्या राखीव पोलीस निरीक्षक यांनी केले आके.

# प्रभात हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा



**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री /प्रतिनिधी**/फुलंब्री तालुक्यातील निधोना येथील प्रभात हायस्कूल हायस्कुल च्या वर्ष २०१०आणि २०१५ च्या बॅचमधील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा शाळेच्या प्रांगणात आनंदी आणि उत्साही वा-तावरणात शनिवारी (ता. २५) पार पडला.यावेळी या कार्यक्रमात सुरुवा-तीला महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज आणि ज्यांनी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.त्या नंतर शाळेतील काही शिक्षक व विद्यार्थी यांचे निधन झाले त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

**_माजी विद्यार्थी यांचकडून झाडे लावण्याचा उपक्रम**

नंतर स्नेह मेळावा निमित्ताच्या भेटीत सर्व मित्र-मैत्रिणी अनेक वर्षांनी एकत्र आले आणि त्यांनी शालेय जी-वनातील गोड आठवणींना उजाळा दिला.कार्यक्रमात माजी विद्यार्थ्यांनी त्यांच्या शिक्षकांना आदरपूर्वक स्मरून, जुन्या दिवसांची आठवण ताजी केली. या वेळी सर्व विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन शाळेच्या प्रगतीसाठी भविष्यात योगदान देण्याचा निर्धार व्यक्त केला. या भेटीमुळे विद्यार्थी बंध पुन्हा एकदा मजबूत झाल्याची भावना सर्वांच्या चेहऱ्यावर दिसून आली. माजी विद्यार्थ्यांनी एकमेकांसोबत फोटोसेशन करून आनंद व्यक्त केला.त्या नंतर शाळेच्या आवारात माजी विद्यार्थी व शिक्षकवृंद यांच्या वतीने विविध प्रकारचे झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.प्राचार्य पिंपळे ,प्राचार्य पांढरे, तर प्रमुख पाहुणे म्हणून राजळे , राऊतराय , बी गाडेकर , एस गाडेकर,वैष्णव ,साळवे ,शिवाजी ,रघ-ुनाथ आणि सर्व माजी विद्यार्थी उपस्थित होते.यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार शुभम जगताप यांनी केले तर आभार अनंता गाडेकर यांनी केले.

## जरंडी ग्रामपंचायतीची बांबूची शेती,लोकसहभागातून उपक्रम

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव / प्रतिनिधी** / गावाच्या विकासा सोबतच शेतीशी नाळ जोडून जरंडी ग्रामपंचायतीने बटाई ने शेती करून दोन एकर क्षेत्रात बांबूच्या रोपांची लागवड केली शेतीच्या सोबत स्मशानभूमीत व हुतात्मा राजहंस स्मारकात ही दोन हजार पाचशे बांबूच्या रोपांची शनिवारी लागवड केली दरम्यान ग्रामपंचायतिचा बांबू शेतातून येणाऱ्या उत्पन्नातून गावाचा चेहरा मोहरा बदलविण्याचा संकल्प ग्रामपंचायतीने केला आहे सरपंच स्वातीताई पाटील,उपसरपंच संजय पाटील,ग्रामपंचायत अधिकारी सुनील मंगरुळे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविला आहे लोकसहभागातून ग्रामपंचायतने बांबुची शेती हा राज्यातील पहिला एकमेव प्रकल्प ठरला आहे दरम्यान बटाईने ग्रामपंचायत ने यापूर्वीही आंब्याची व शेवग्याची शेती केली आहे यातून मिळालेल्या उत्पन्नातून गावाचा विकास साधण्याची किमया जरंडी ग्रामपंचायतीने साधली आहे...

दरम्यान ग्रामपंचायतने कसलेल्या बांबूच्या शेतीची मशागत लोकसहभागातून करण्यात येणार आहे असे ग्रामपंचायत अधिकारी सुनील मंगरुळे यांनी सांगितले आहे दररोज एक जण शेती वर मशागत व देखभाल करण्यासाठी जाणार आहे ग्रामपंचायत कर्मचारी या बांबूच्या शेतीवर लक्ष केंद्रित करतील असे सरपंच स्वाती ताई पाटील यांनी सांगितले.

## एका दिवसात २.७६ लाख प्रवाशांची रेल्वे वाहतूक यशस्वीपणे हाताळली



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी** / दिवाळीच्या सुटीनंतर परतणाऱ्या प्रवाशांच्या प्रचंड गर्दीचा सामना करत, नांदेड विभागाने दिनांक २६ ऑक्टोबर २०२५ रोजी एका दिवसात एकूण २.७६ लाख प्रवाशांची रेल्वे वाहतूक यशस्वीरीत्या हाताळली.दिनांक २६ ऑक्टोबर त्या दिवशी हजूर साहेब नांदेड, परभणी आणि छत्रपती संभाजीनगर या प्रमुख स्थानकांवर प्रवासी संख्येत लक्षणीय वाढ झाली.

**पुढील वृत्त पान ४ वर...**

# गंगापूर शहरातील 'हक्काचा माणूस' झळकणार नगरपालिका नगराध्यक्षाच्या खुर्चीवर



**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/ प्रतिनिधी** / गंगापूर करांच्या मदतीला धा-वून येणारा, संकटकाळी मदत करणारा, अभ्यासू कार्यकर्ता, आपला माणूस, उगवते नेतृत्व, कामाचा माणूस, हक्काचा माणूस अशी चर्चेत असलेला असंख्य कार्यकर्ता गंगापूर नगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा जनतेच्या सुखदु:खात शामील होणारा नेता जनतेत पाहायला मिळत आहे.

निवडणूक आता दोन ते दिड महिन्यांनी होणार आहे, त्यानिमित्ताने हेच कार्यकर्ते आता मतदारांच्या गर्दीत पाहायला मिळत आहेत. सार्वत्रिक निवडणूक नोव्हेंबर २०२० नगपालिकेच्या निवडणुका अनिश्चित काळासाठी पुढे मध्ये होणे अपेक्षित होते. परंतु विविध कारणांनी गेल्या. निवडणूक लढविणाऱ्या कार्यकर्त्यांनी २०१९ पासून तयारी केली, परंतु निवडणूक काही जाहीर होत नाही म्हटल्यावर त्यांनी त्यांचे प्रयत्न थांबविले. २०२१ पर्यंत वाट पाहिली त्यानंतर ना सामाजिक कार्य, ना जनतेला मदत झाली. आता निवडणूक लवकरच होणार आहे. यासाठी आपला हक्काचा माणूस निवडून देणे हेच जनतेची अपे-क्षा आहे दहा वर्षांपूर्वी गंगापूर शहराची काय परिस्थिती होती. आणि आजची परिस्थिती पाहता गंगापूर चा नगराध्यक्ष प्रदीप भैय्या पाटील हेच होणार असल्याची चर्चा शहरांमध्ये सुरू झाली आहे. गंगापूर नगरपालिकेचा चे-हरा मागील काळात नगराध्यक्ष महिला राज सुरू झाले होते तेव्हापासून गंगापूर शहराचा चेहरा मोहरा बदलला यामध्ये विकास कामांचा परिणाम गंगापूर शहरातील नागरिकांना पाहायला मिळाला.

आता सध्या गंगापूर नगरपालिकेचा नगराध्यक्ष होणार कोण याकडे सर्व नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# श्री क्षेत्र वेरूळ येथे आयोजित केलेल्या राम कथेस उत्साहात प्रारंभ

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद /प्रतिनिधी**/ खुलताबाद तालुक्यातील वेरूळ येथील बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर मंदिरानजीक श्री जनार्दन स्वामी मठाच्या कथा मंडपात २५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी शोभायात्रेने श्रीराम कथेला उत्साहाने प्रारंभ झाला. ही कथा २ नोव्हेंबर पर्यंत चालणार आहे. प. पू. संत श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांचे परमशिष्य व प्रख्यात राम कथाकार रवींद्र पाठक (पुणे) हे कथेचे सुंदर निरूपण करत आहेत.चैतन्य गोशाळा विश्वस्त मंडळाच्या वतीने या राम कथेचे आयोजन करण्यात आले असून कथेच्या पहिल्या दिवशी शनिवारी सायंकाळी कथा स्थळापासून श्री घृष्णेश्वर मंदिरापर्यंत ग्रंथ, हनुमान मूर्ती, दादा महाराज व कथाकार रवींद्र पाठक यांची सजवलेल्या रथातून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली यामध्ये हजारो भाविक सहभागी झाले होते.चैतन्य शाळा विश्वस्त मंडळाच्या वतीने दरवर्षी राम कथेचे आयोजन ज्योतिर्लिंग स्थान करण्यात आलेले आहे. वेरूळ येथील श्री घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग स्थानावर सदरील १२ व्या राम कथेचे आयोजन करण्यात आलेले आहे. कथा श्रवणासाठी देश विदेशातील जवळपास एक हजार भाविक वेरूळ नगरीत दाखल झालेले आहेत कथा स्थानावरच या सर्व भाविकांची भोजनाची व्यवस्था करण्यात आ-लेली आहे.

आयोजित केलेल्या राम कथेच्या श्रवणाचा व प्रसादाचा लाभ भाविकांनी घ्यावा असे आव-हान कथाकार रवींद्र पाठक यांनी केले आहे. कथा आयोजनाच्या यशस्वीतेसाठी हिंदराव पवार, ना-गनाथ इनामदार सचिन नाईक यांच्यासह भाविक परिश्रम घेत आहेत.चैतन्य गोशाळा विश्वस्त मंडळातर्फे सर्व ज्योतिर्लिंग स्थानी राम कथेचे आयोजन पूर्ण करण्यात आले आहे. केदारनाथ ज्योतिर्लिंग स्थान मंदिराला लागूनच रामकथा करण्याचा योग मंडळाला लाभला होता त्याचप्रमाणे श्रीक्षेत्र काशी येथे भव्य आयोजनात ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची भाविकांनी हत्तीवरून भव्य मिरवणूक काढली होती.चैतन्य गो शाळेच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमही राबविले जा-तात यामध्ये गोसंवर्धन व गोवंश वाढीसाठी प्रयत्न करण्यात येत असून २०० गोमातांचे संगोपन गोशाळेच्या वतीने करण्यात येत आहे त्याचप्रमाणे. नैसर्गिक आपत्तीमध्ये सर्वस्व गमावलेल्या ७० कुटुंबांना दत्तक घेण्यात आले असून यातील ६० कुटुंबांना या संकटातून सावरण्यासाठी गोशाळेच्या वतीने सहाय्य करण्यात आले असल्याचे कथाकार रवींद्र पाठक यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.



# तालुक्यातील शेतकऱ्यांचे पिकांची नुकसान भरपाई न मिळाल्यामुळे आत्मदहन आंदोलनाचा इशारा

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर /प्रतिनिधी /सुभान शहा**/ गंगापूर तालुक्यातील शेतकऱ्यांचे पिकांची नुकसान भरपाई न मिळाल्यामुळे आत्मदहन आंदोलनाचा इशारा शासकीय मका खरेदी केंद्र गंगापूर तालुक्यात चालू करण्याची मागणी गंगापूर तहसी-लदार यांच्याकडे निवेदन सादर दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की गंगापूर तालुक्यातील मागील महिन्यामध्ये झालेल्या अतिवृष्टी पावसामुळे शेतीच्या पिकाचे फार मोठे नुकसान झाले आहे. शासनाने दीपावली अगोदर शेतकऱ्यांच्या खात्यात सरसकट अनुदान देण्याचे घोषित केले होते परंतु दीपावली अगोदर शेतकऱ्यांच्या खात्यात काही अनुदान शासनाने जमा केले नाही शेतकऱ्यांची दिवाळी ही अंधारातच झाली शासनाला शेतकऱ्यांचे काही गांभीर्य वाटतच नाही शेतकरी हा कर्जबाजारी झालेला आहे. शेतकऱ्यांसमोर मोठ मोठाले आव्हाने उभे राहिलेले आहे. काही शेतकऱ्यांची तर शेती बाहून गेलेली आहे टाकळी धरणाचे ओव्हर फ्लो पाणी शिवना नदीत सोडल्यामुळे शिवना नदी काठील बऱ्याचशा शेतकऱ्यांची शेती वाहून गेली त्या शेतकऱ्यांचे उभे पिके वाहून गेले मक्का पीक असो किंवा कपाशी सोयाबीन असो शासनाने मदत अतिशय तुटपुंजी दिले-ली आहे एकरी दोन ते तीन हजार रुपये देऊन शासनाने शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले आहे. एक एकर कपाशी किंवा मक्का लागवडीचा खर्च तीस ते पस्तीस हजार रुपये येत आहे एकरी मक्का होत आहे २० ते ३० क्विंटल मक्का ला सध्या भाव चालू आहे ११०० ते १२०० रुपये क्विंटल व्यापारी वर्गांनी शेतकऱ्यांना लुटण्याचे काम चालू केले आहे. कमी दराने मक्का खरेदी करून शेतकऱ्यांना नाविलाजा पाई मक्का व्यापाऱ्यांना द्यावी लागत आहे. शासनाला विनंती आहे की शासकीय मका खरेदी केंद्र त्वरित चालू करा कापूस खरेदी केंद्र त्वरित चालू करा शासकीय भावाने मका खरेदी झाली पाहिजे या सर्व समस्या शास-नाने त्वरित सोडल्या पाहिजे या शास-नाला जाग येण्यासाठी तसेच गंगापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी दिनांक २९/१०/२०२५ बुधवार सकाळी ११.०० वाजता गंगापूर तहसीलदार यांच्या केबिनमध्ये जाऊन सर्व तालुक्यातील शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी कामगार संघटनेचा जिल्हाध्यक्ष या नात्याने व शेतकरी हितासाठी स्वतः आत्मदहन आंदोलन करत आहे शासनाने या आत्मदहन आंदोलनाची गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे या निवेदनावर प्रदिप पा. चव्हाण, विशाल पा. लांडगे, राजू बारवाल, यांच्या साक्षर्य आहे.

# मतदार याद्यांसंदर्भातील आक्षेप, तक्रारींचे तात्काळ निराकरण करा- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** मतदार याद्यांसंदर्भात नागरिकांच्या असणाऱ्या आक्षेप व तक्रारींचे तात्काळ निराकरण करावे,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभुमिवर निवडणूक आयोगाने दि. १ जुलै २०२५ रोजी अंतिम केलेल्या मतदार याद्यांबाबत काही ठिकाणी आक्षेप घेण्यात आले आहेत. त्यात दुबार नावे असणे ही तक्रार प्रामुख्याने आहे. यासंदर्भात आज जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेण्यात आली. अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, डॉ. सुचिता शिंदे, एकनाथ बंगाळे, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रविण फुलारी तसेच जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, नगरपालिकांचे मुख्याधिकारी आदी दुरदृष्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी निर्देश दिले की, प्रत्येक मतदार यादीची बुथनिहाय पडताळणी करावी. आपल्यामतदार याद्या ह्या बिनचुक असतील याबाबत खबरदारी घ्यावी. मतदार याद्यांसंदर्भात आलेल्या प्रत्येक तक्रारीचे निराकरण करण्यात यावे. तक्रारदारांचे शंकासमाधान करण्यात यावे.मतदार याद्यांवर घेतलेल्या आक्षेपांबाबत निर्णय घेण्यात यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले.

**दुबार मतदार नावनोंदणी आक्षेपांसंदर्भात कार्यपद्धती**

जिल्ह्यात प्रामुख्याने दुबार मतदार नोंदणी संदर्भात आक्षेप असून याबाबत अवलंबावयाची कार्यपद्धती राज्य निवडणूक आयोगाने दिले आहे. त्यानुसार, दुबार नावांसंदर्भात प्राथमिक चौकशी करावी. दुबार नावे एकाच व्यक्तीची आहेत हे लक्षात आल्यानंतर तो मतदार एकच आहे याबाबत खात्री करावी. एकापेक्षा जास्त प्रभागात एकाच मतदाराचे नाव आले असल्यास अशा मतदारांच्या नावांची यादी सुचना फलकावर, वेबसाईटवर प्रसिद्ध करावी. असे मतदार हे कोणत्या प्रभागात मतदान करणार आहेत याबाबत लेखी अर्ज करण्याचे त्यांना आ-वाहन करावे. जे मतदार या आवाहनाला प्रतिसाद देऊन कोणत्या प्रभागात मतदान करणार आहेत हे कळवतील त्यानुसार अंतिम मतदार यादी व मतदान केंद्रनिहाय मतदार यादीत नोंद घ्यावी. मतदारांनी आव-ाहनास प्रतिसाद न दिल्यास मतदार यादीतील अशा सर्व नावांसमोर दुबार नाव अशी नोंद करावी. असे मतदार मतदानासाठी आल्यास केंद्राध्यक्षांनी त्यांच्या ओळखपत्रावरुन त्यांच्या खरेपणाविषयी खातरजमा करावी व खात्री पटल्यानंतरच मतदान करु द्यावे.



## संक्षिप्त

### अनोळखी इसमाची ओळख पटविण्यासाठी आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना(प्रतिनिधी)** सराफा लाईन जालना येथे एक अनोळखी पुरुष जातीचे प्रेत अंदाजे वय ५० ते ५५ वर्षे दि. २४ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ७.४० वाजता आढळुन आलेले आहे. अनोळखी इसमाची उंची अंदाजे ५.५ फुट, अंगावर पांढरे मळकट लाईनिंगचे शर्ट व अंगावर भगव्या रंगाचे कापड, रंग सावळा व केस पांढरे असून दाढी वाढलेली आहे. तरी या अनोळखी मृत इसमाची ओळख पटविण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन पोलिस ठाणे सदर बाजार, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.






कैलास दातखीळ हे विभागीय शिक्षण उपसंचालकपदी छत्रपती संभाजीनगर येथे रुजू झाल्याबद्दल त्यांचे जालना माध्यमिक शिक्षणाधिकारी बाळासाहेब खरात व माजी शिक्षणाधिकारी रमेश तांगडे तसेच उद्धव म्हस्के, राजु देव्हडे,किशोर जोगदंड, अनिल भेरे पाटील यांच्या वतीने शाल श्रीफळ देऊन सत्कार व शुभेच्छा देण्यात आल्या.

### विप्र फाउंडेशनतर्फे वृंदावन येथे पं. मनोजजी त्रिवेदी यांच्या वाणीतून भागवत कथा सोहळा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** श्री जी भागवत सेवा समिति व विप्र फाउंडेशन जालना यांच्या संयुक्त विद्यमाने श्री क्षेत्र वृंदावन येथे दि. २९ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबरदरम्यान हैदराबाद येथील प्रसिद्ध भागवताचार्य व प्रवचनकार पं. मनोजजी त्रिवेदी (श्रीमाली) यांच्या रसाळ वाणीतून श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून, भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



वृंदावन येथील लाला बद्रीप्रसाद सेवा सदनमध्ये दररोज दुपारी ३ ते सायंकाळी ७ या वेळेत कथा होणार आहे. कथेदरम्यान श्रीकृष्ण जन्मोत्सव, गोवर्धन पूजा, रूक्मणी विवाह सोहळा, नंदोत्सव, अवतार कथानक यांसारखे अनेक भाविकांच्या भावविश्वास स्पर्श करणारे अध्यात्मिक प्रसंग सादर केले जाणार आहेत. ३ नोव्हेंबर रोजी नंदोत्सवनिमित्त छत्रपती संभाजीनगर येथील श्यामा सतीश व्यास यांच्यावतीने, ४ नोव्हेंबर रोजी कृष्ण रुक्मिणी विवाहनिमित्त नवीन चंद्र राजेंद्र कुमार शर्मा यांच्यावतीने तर ५ नोव्हेंबर रोजी समारोपप्रसंगी वंदना दीपक व्यास, ईला मिथुन व्यास, नेहा रितेश व्यास, अंजली सुनील ओझा, ज्योती चंद्रुजी यांच्यावतीने महाप्रसादीचे आयोजन करण्यात आले आहे.

या पवित्र भक्तीमय वातावरणात सहभागी होऊन कुटुंबासह कथा श्रवणाचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन श्री जी भागवत सेवा समितीचे दिलीप व्यास, चंद्रप्रकाश श्रीमाली, दीपेश व्यास, सूर्यप्रकाश श्रीमाली, नवीनचंद्र शर्मा, विप्र फाउंडेशन जालनाचे अध्यक्ष जयप्रकाश श्रीमाली, सचिव विजयकुमार व्यास, कोषाध्यक्ष ललित बिजावत, जिल्हा समन्वयक रामनिवास गौड आणि पवन जोशी, विप्र घटक समाज अध्यक्ष कैलाश खंडेलवाल, किशोर मिश्रा, विनोद दायमा, चंद्रकांत शर्मा, उमेश पंचारिया, विप्र फाउंडेशन युवा मंच अध्यक्ष परीक्षित शर्मा, विप्र महिला मंडळाच्या अध्यक्षा जया शर्मा, मंजू श्रीमाली, अरूणा पारीख व मधु शर्मा यांनी केले आहे.

# ३१ ऑक्टोबर रोजी प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** नोकरीच्या शोधात असलेल्या जालना जिल्ह्यातील युवक-युवतींना विविध खासगी कंपन्या, कारखाने, उद्योग-व्यवसाय आणि आस्थापना यांचेकडील रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याच्या उद्देशाने तसेच रोजगार सहाय्यासाठी विशेष मोहिम सुरू करण्यात आली आहे. याप्रमाणे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालना यांच्याकडून जालना येथे शुक्रवार दि.३१ ऑक्टोंबर, २०२५ रोजी प्लेसमेंट ड्राईव्ह-जागेवर निवड संधीचे आयोजन सकाळी ११ ते दु.२ वाजेपर्यंत करण्यात आले आहे.स्वतंत्र मायक्रोफिन प्रा.लि. मुंबईचे फिल्ड ऑफिसर पदाकरिता दहावी, बारावी, आय. टी.आय. उत्तीर्णांसाठी २५ पदे, त्याच प्रमाणे दहावी, बारावी उत्तीर्णसाठी फिल्ड प्रतिनिधीचे २५ पदे असे एकूण ५० रिक्तपदे प्राप्त झालेली आहेत. याकरीता नोकरी इच्छुक पात्रताधारक उपस्थित होणा-या उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येवून जागेवरच निवडीची संधी उपलब्ध आहे. जालना जिल्ह्यातील नोकरी इच्छुकांनी या संधीचा लाभ व अधिक माहिती घेण्यासाठी विभागाच्या ु.ीक्षसरी.रहरीुरा.सीें.ळप या संकेतस्थळाला भेट द्यावी. त्याचप्रमाणे केंद्र शासनाच्या एन.सी.एस. पोर्टलवर रजिस्ट्रेशन करण्यासाठी देखील ु. पली.सीें.ळपया संकेतस्थळावर नोंदणी करावी. यापूर्वी नोंदणी केली नसल्यास प्रथम आपली नोंदणी करावी आणि होम पेज वरील नोकरी साधक लॉगिनमधून आपल्या युजर आयडी व पासवर्डच्या आधारे लॉगिन करावे. त्यानंतर डॅशबोर्डमधील प्लेसमेंट ड्राईव्ह-जागेवर निवड संधीया बटनावर क्लिक करून जालना जिल्हा निवडून त्यातील प्लेसमेंट ड्राईव्ह जालना-०५ याची निवड करावी किमान दोन प्रतीत बायोडाटासह फोटो, शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, इ.कागदपत्रे कंपनींना देण्यासाठी छायाप्रती संच सोबत ठेवून दि.३१ ऑक्टोंबर, २०२५ रोजी सकाळी ११ ते दु. २ या वेळेत प्रत्यक्ष मुलाखतीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर, प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, जालना येथे उपस्थित राहून या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये सहभागी व्हावे आणि रोजगाराच्या या पर्वणीचा निश्चित लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### अंबड तालुका अध्यक्षपदी राजेंद्र मातोळे यांची नियुक्ती

**महा पोलीस मित्र संघ महाराष्ट्र राज्य**

**आत्ताच एक्सप्रेस**



**सुखापूरी /प्रतिनिधी/** महा पोलीस मित्र संघ महाराष्ट्र राज्य च्या वतीने अंबड तालुका अध्यक्षपदी राजेंद्र रघ-ुनाथ मातोळे यांची निवड करण्यात आली आहे. संस्थेच्या ध्येयधोरणांना अनुसरून आणि सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग लक्षात घेऊन ही नियुक्ती करण्यात आली आहे. राजेंद्र मातोळे यांची निवड महा पोलीस मित्र संघ महाराष्ट्र राज्यचे संस्थापक अध्यक्ष अनिता लष्करे व उप संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण पवार तसेच महाराष्ट्र संपर्कप्रमुख रमेश बी. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.

नवनिर्वाचित तालुका अध्यक्ष राजेंद्र मातोळे यांच्यावर अंबड तालुक्यात संघटनेचे कार्य अधिक प्रभावीपणे वाढवण्याची व पोलीस प्रशासनाला मदतीचा हात देण्यासाठी मित्रत्वाची भूमिका अधिक मजबूत करण्याची जबाबदारी असणार आहे. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

# नोवेंबर पासून चेक बाउन्स खटल्यांना आता वेग येणार! - धन्नाव

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जालना देशभरातील न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या लाखो चेक बाउन्सच्या खटल्यांना गती देण्यासाठी आणि न्यायप्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने संजबीज तारी विरुद्ध किशोर एस. बोरकर आणि इतर ( क्रिमिनल आपील १७५५/२०१०) या खटल्यात ऐतिहासिक निर्णय दिला आहे. या निर्णयाद्वारे न्यायालयाने केवळ जुन्या निकालाला कायम ठेवले नाही, तर चेक बाउन्सच्या खटल्यांसाठी देशभरातील सर्व न्यायालयांना बंधनकारक असणारी नवीन आणि अत्यंत महत्त्वाची मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत जे नोवेंबर पासून कार्यारत होतील, अशी माहिती नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश धनावत यांनी दिली.ड. धनावत यांनी सांगितले की, या नवीन निर्देशांमुळे चेक बाउन्सच्या प्रकरणांमध्ये होणारा विलंब टाळता येईल आणि पीडित पक्षाला लवकर न्याय मिळेल.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातील प्रमुख मुद्दे आणि नवीन मार्गदर्शक तत्त्वे: समन्स बजावण्याची नवीन पद्धत:

आतापर्यंत चेक बाउन्सच्या खटल्यात आरोपीला समन्स बजावण्यासाठी केवळ पारंपरिक पद्धतींचा वापर होत असे, ज्यामुळे खूप वेळ वाया जात असे. नवीन निर्देशांनुसार, आता तक्रारदाराला स्वतः (दस्ती) समन्स बजावण्याची परवानगी असेल. यासोबतच, ईमेल, व्हॉट्सप किंवा इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारेही समन्स बजावले जाईल.

यासाठी तक्रारदाराला आरोपीचा ईमेल आयडी आणि मोबाईल नंबर प्रतिज्ञापत्रासह न्यायालयात सादर करावा लागेल. हे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम ६४ आणि ५३० नुसार केले जाईल.ऑनलाइन पेमेंटची सोय:खटल्याच्या सुरुवातीलाच तडजोड व्हावी, यासाठी प्रत्येक जिल्हा न्यायालयात क्यु आर कोड किंवा यू पी आय लिंकद्वारे ऑनलाइन पेमेंटची सुविधा निर्माण करण्याचे निर्देश दिले आहेत. आरोपीला समन्समध्येच ही माहिती दिली जाईल, जेणेकरून तो सुरुवातीलाच चेकमधील रक्कम भरून प्रकरण मिटवू शकेल. खटल्यासाठी प्रमाणित सारांश प्रत्येक नवीन खटल्यासोबत एक प्रमाणित सारांश जोडणे बंधनकारक केले आहे. यामध्ये तक्रारदार, आरोपी, चेक क्रमांक, रक्कम, बँक, चेक न वटल्याचे कारण आणि कायदेशीर नोटीस यांसारखी सर्व माहिती एकाच ठिकाणी मिळेल, ज्यामुळे न्यायालयाचा वेळ वाचेल.आरोपीला थेट प्रश्न विचारण्याचा अधिकार:न्यायालय आता खटल्याच्या सुरुवातीलाच, फौजदारी प्रक्रिया संहिता च्या कलम २५१ / भारतीय नागरिक सुरक्षा संहिता च्या कलम २७४ अंतर्गत आरोपीला काही थेट प्रश्न विचारू शकेल, जसे की:चेक तुमच्या खात्याचा आहे का? चेकवरील सही तुमची आहे का? तुम्ही हा चेक तक्रारदाराला दिला होता का?

यामुळे आरोपीचा बचाव काय आहे, हे सुरुवातीलाच स्पष्ट होईल आणि खटला लवकर निकाली काढता येईल.तडजोडीसाठी नवीन आणि सुलभ नियम:चेक बाउन्सचे खटले हे तडजोडपात्र असल्याने, न्यायालयाने तडजोडीला प्रोत्साहन देण्यासाठी खर्चाच्या नियमांमध्ये मोठा बदल केला आहे:

आरोपीचा पुरावा नोंदवण्यापूर्वी रक्कम भरल्यास: कोणताही अतिरिक्त खर्च नाही. पुरावा नोंदवल्यानंतर पण निकालापूर्वी रक्कम भरल्यास: चेकच्या रकमेवर ५% अतिरिक्त खर्च. सेशन किंवा उच्च न्यायालयात अपील/रिव्हिजनमध्ये रक्कम भरल्यास: ७.५% अतिरिक्त खर्च. सर्वोच्च न्यायालयात रक्कम भरल्यास: १०% अतिरिक्त खर्च.या नवीन नियमांमुळे आरोपींना खटल्याच्या सुरुवातीच्या टप्प्यातच प्रकरण मिटवण्यासाठी प्रोत्साहन मिळेल.कायद्यातील बदलांची नोंद घेणे आवश्यक:ड. धनावत यांनी हेही स्पष्ट केले की, नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीमुळे आता जुन्या कायद्यांऐवजी नवीन कायद्यांचा उल्लेख करणे महत्त्वाचे आहे.

इंडियन पिनल कोड फभारतीय न्याय संहिता २०२३, कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजर फ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३इंडियन एव्हिडन्स क्ट फ भारतीय साक्ष्य अधिनियम , २०२३ सर्वोच्च न्यायालयाचे हे निर्देश चेक बाउन्सच्या खटल्यांमध्ये एक क्रांतिकारी बदल घडवून आणतील. यामुळे केवळ न्यायालयांवरील कामाचा बोजा कमी होणार नाही, तर सामान्य नागरिक आणि व्यावसायिकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होईल.

### बीडमध्ये पदवीधर मतदार नोंदणी जनजागृती अभियानास पदवीधरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद.

बीड ( प्रतिनिधी ) बीडमध्ये पदवीधर मतदार नोंदणी जनजागृती अभियान राबविण्यात आले, या अभियानाचा उद्देश समाजामध्ये अनेक पदवीधर बांधव आहेत, लोकशाहीचे चौथे आधारस्तंभ हेच मतदार असून त्याची जाणीव पदवीधर मतदारांमध्ये व्हावी तसेच पदवीधर बांधव सुशिक्षित असून त्यांना स्वतःला स्वतःचा हक्क बजावता यावा, पदवीधरांची ताकद दिसावी, पदवीधर यांचे प्रश्न मांडणारा योग्य प्रतिनिधी विधान परिषदेच्या सभागृहात पाठविता यावा, यासाठी मतदार नोंदणी आवश्यक आहे.

# जालना येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकास निधी उपलब्ध करून देणार- मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जालना शहरातील अंबड चौफुली येथील राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भव्य स्मारक उभारण्यासाठी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे निधीची मागणी एका निवेदनाद्वारे केली.भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी (दि.२६) रोजी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची नागपूर येथे भेट घेऊन त्यांच्याकडे निवेदन दिले.

या निवेदनात म्हटले आहे की, जालना शहरातील अंबड चौफुली मुख्य चौक येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे ३०० वर्ष जयंतीदर्शन साजरे करण्यासाठी भव्य शिल्प स्मारक व मराठवाड्यातील सर्वात उच्च पुतळा उभारण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प प्रस्तावित आहे.

राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे सार्वजनिक जीवन, प्रशासनिक कौशल्य, सामाजिक कार्याचे मूल्य व महिला सक्षमीकरणातील योगदान हे प्रेरणादायी असून, त्यांच्या स्मृतीस स्थानिक पातळीवर सन्मानित करण्यासाठी हा भव्य शिल्प स्मारक व पुतळा उभारण्यात येत आहे.

प्रस्तावित भव्य शिल्प स्मारक, पुतळा व परिसरातील सुशोभिकरणासाठी पायाभूत सुविधा, प्रकाश योजना, बेंचेस व सौंदर्यशास्त्रानुसार सुशोभित उभारणी यासाठी अंदाजे खर्च अंदाजित ३.०० कोटी रुपये (तीनकोटी) इतके आहे.



या भव्य शिल्प स्मारक उभारणे व परिसराचे सुशोभिकरण करण्यास विशेष बाब म्हणून ३.०० कोटी इतका निधी मंजूर करण्यात यावा अशी मागणी निवेदनात केली आहे, सदर निवेदनाची मुख्यमंत्री महोदयांनी दखल घेऊन जालना शहरातील राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या भव्य शिल्प स्मारकास निधी उपलब्ध करून देणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांना दिले.यावेळी कपिल दहेकर, नंदकिशोर टेकाळे, विकास खरात यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# राजकारणापेक्षा माझ्यासाठी समाजकारण महत्त्वाचे -दलित आघाडी जिल्हाप्रमुख ॲड. भास्कर मगरे

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** राजकारणापेक्षा माझ्यासाठी समाजकारण महत्वाचे असल्याचे प्रतिपादन शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्करराव मगरे यांनी केले.जालना तालुक्यातील वाघ्रुळ येथे दलित आदिवासी मेळावा घेण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्कर मगरे बोलताना म्हणाले, दलित आदिवासी जाती-जमातीचे मूलभूत प्रश्नावर शिवसेना दलित आघाडीच्या वतीने आंदोलनाच्या माध्यमातून रस्त्यावरचा संघर्ष सुरू आहे. दलित आदिवासी सोबतच गावगाड्यातील अनेक समस्या आहेत. त्या समस्या सोडविण्याचे प्रयत्न जालना जिल्हा शिवसंपर्क सामाजिक अभियानातून सोडविण्याचे यशस्वी प्रयत्न झाले आहेत. दलित आदिवासी,भूमिहीन कास्तपट्टे प्रलंबित प्रश्न, गावगाड्यातील घरकुले प्रश्न जागेविना अनेक लाभार्थी वंचित आहेत.सर्वांसाठी घरे-२०२२-२४ अधिनियमानुसार मागेल त्याला घर आणि राहील तिथे घर लाभार्थी गावठाणमध्ये राहत असेल तर गावठाण ८ अ उत्तरेला नोंद घेऊन समोर ठेवून त्या लाभार्थ्याला घरकुल देण्यात यावे तसेच गायरानात रहात असेल तर २०११ पूर्वीचा पुरावासमोर ठेवून त्या लाभार्थ्याला घरकुल देण्यात यावे असे सर्वांसाठी घरे ग्रामीण २०२२-२४ मध्ये नमूद असताना प्रशासकीय यंत्रणा

या अधिनियमाचे अंमलबजावणी करत नाहीत अंमलबजावणी केल्यास उपेक्षित समाजातील एक ही लाभार्थीघरकुलापासून वंचित राहणार नाही.

पुढे मगरे म्हणाले की, त्याचप्रमाणे निराधाराचा निराधाराच्या मासिक दे अनुदानात दीड हजार ऐवजी तीन हजार रुपये केल्यास निराधार चांगल्या पद्धतीने जगू शकतील. त्याचप्रमाणे ग्रामीण भागात तरुणांमध्ये बेकारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहे. तेव्हा शासकीय आर्थिक विकास महामंडळाकडून उदाहरणार्थ महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, संत रोहिदास आर्थिक विकास महामंडळ या व इतर महामंडळाकडून ग्रामीण भागातील बेरोजगार तरुणांना कर्ज वितरण ग्रामीण भागातील तरुण बेरोजगारीला हातभार लागल्याशिवाय राहणार नाही आणि म्हणून शिवसेना दलित आघाडीच्या वतीने शिवसंपर्क सामाजिक



अभियानामार्फत व लोक आंदोलनाच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केल्या जात आहे आणि म्हणून जनतेचे जीवनमान सुधारणारे प्रश्नाचे सोडवणूक झाली पाहिजे म्हणून यासाठी राजकारणापेक्षा समाजकारण महत्त्वाचे आहे, असेही ॲड. मगरे म्हणाले. याप्रसंगी जय खरात,अण्णासाहेब बाळराज यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

### एका दिवसात २.७६ लाख प्रवाशांची रेल्वे वाहतूक पान ३ वरून...

दिनांक २६ ऑक्टोबर त्या दिवशी हजूर साहेब नांदेड स्थानकावर २०२५ मध्ये ७१,८९६ प्रवासी नोंदवले गेले, जे मागील वर्षीच्या दररोज सरासरी ४४,६०९ प्रवाशांपेक्षा खूप जास्त आहेत.

परभणी स्थानकावर ३९,०५६ प्रवासी, तर छत्रपती संभाजीनगर स्थानकावर ४९,०७८ प्रवासी प्रवास करताना नोंदवले गेले, जे अनुक्रमे मागील वर्षीच्या सरासरी २६,१५७ व ३१,४३६ प्रवाशांपेक्षा जास्त आहेत.२६ ऑक्टोबर २०२५ रोजी नांदेड विभागाने एकूण २,७६,१९९ प्रवाशांची वाहतूक केली, ज्यात ५७,७६५ आरक्षित प्रवासी आणि २,१८,४३४ अनारक्षित प्रवासी यांचा समावेश होता.प्रवाशांच्या सोयीसाठी विभागाने दिवाळी विशेष गाड्या चालवल्या तसेच काही नियमित गाड्यांना अतिरिक्त डबे जोडले. तसेच, प्लॅटफॉर्मवरील गर्दी टाळण्यासाठी आणि रेल्वे सेवा सुरळीत ठेवण्यासाठी विभागाने उच्च दर्जाची वेळपालनता (पंक्चुॲलिटी) राखली.

सुरक्षित आणि आरामदायी प्रवासासाठी विभागाने अनेक उपाययोजना केल्या - ज्यामध्ये अधिक कर्मचारी नियुक्त करणे, गर्दी नियंत्रण व्यवस्था, प्रवासी मार्गदर्शन, सुरक्षा उपाय मजबूत करणे तसेच रेल मदत आणि स्टेशन हेल्पडेस्कद्वारे तत्काळ सहाय्य उपलब्ध करून देणे यांचा समावेश आहे.वरील सर्व उपाययोजना श्री प्रदीप कामले, विभागीय रेल्वे व्यवस्थापक, नांदेड यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली प्रभावीपणे राबविण्यात आल्या.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813